# भारतीय विचारवंत



संपादक

डॉ. नीलम छंगाणी

डॉ. नितीन चौधरी

Scanned with CamScanner

भारतीय विचारवंत : डॉ. नीलम छंगाणी, डॉ. नितीन चौधरी

प्रकाशक :

ॲड. कु. जे. व्हि. भगत

अजिंक्य प्रकाशन

भिमनगर, वापटा पो. कुपटा

ता. मानोरा जि. वाशिम

संपर्क : ९६०४४०२०५३

WhatsApp : 8007143527

Website : www.ajinkyapublication.com

E-mail : ajinkyapublication@gmail.com

ISBN :978-93-90532-20-9

© लेखकाधिन

प्रथम आवृती : जानेवारी २०२१

अक्षर जुळवणी : अजिंक्य प्रिंटीग्स् ॲण्ड कॉम्प्यूटर्स

मुखपृष्ठ : अरविंद मनवर

मुद्रक : अजिंक्य एन्टरप्राईजेस, वाशीम

प्रमुख विक्रेता: अजिंक्य पुस्तकालय, वाशिम

संपर्क : ८००७१४३५२७ / ९६०४४०२०५३

किंमत : रू.४५० फक्त

(या पुस्तकात व्यक्त झालेल्या मतांशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.)

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नाव | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातील राष्ट्रीय जागृती विषयक विचार / प्रा. भास्कर धारणे | ०१ |
| २. | जोतीराव फुले लिखित 'गुलामगिरी' या वैचारिक ग्रंथातील मूल्यविचार / डॉ. कैलास वानखडे | ०६ |
| ३. | युवक कल्याणासंबंधी स्वामी विवेकानंद यांचे विचार / डॉ. अलका मानकर | १२ |
| ४. | म. फूलेंचे ब्रिटीश शासनाविषयी विचार / प्रा. डॉ. दत्ता कुंचलेवाड | १८ |
| ५. | भारतीय समाजशास्त्रज्ञ डॉ. एस. व्ही. केतकर यांचे जातीव्यवस्थेसंबंधीचे विचार - एक समाजशास्त्रीय अध्ययन / डॉ. संजय ब. चौधरी | २३ |
| ६. | डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख / डॉ. माधव सोनेकर | २८ |
| ७. | म. गांधी थोर विचारवंत / डॉ. राजेश्री कडू | ३७ |
| ८. | पंडीत नेहरू : एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व / प्रा.डॉ. सुधिर देशमुख | ४२ |
| ९. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मराठीवाङ्मयासंबंधीचे विचार / डॉ. संदीप बनसोडे | ४६ |
| १०. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधान / प्रा. कुमुद चारमोडे | ५१ |
| ११. | बाराव्या शतकातील धर्मप्रवर्तक श्री. चक्रधरस्वामी / डॉ. माधुरी पाटील | ५८ |
| १२. | जयप्रकाश नारायण यांचा समाजवाद / डॉ. संदीप काळे | ६१ |
| १३. | स्वामी विवेकानंद : विश्व मानव / डॉ. अर्चना धर्मे | ६६ |
| १४. | थोर भारतीय समाजशास्त्रज्ञ – डॉ. गोविंद सदाशिव घुर्ये / डॉ. बळीराम अवचार | ७० |


Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| ४५. | सावित्रीबाई फुलेंच्या शैक्षणिक विचारांचे समाजशास्त्रीय अध्ययन / डॉ. सुनिल गायगोळ | २१४ |
| ४६. | भारतीय विचारवंत / डॉ. केशव गोरे | २२० |
| ४७. | स्वामी विवेकानंदाच्या विचारातील भारतीय स्त्री / प्रा. जगदीश जायेवार | २२६ |
| ४८. | भारतातील उदारमतवादी राजकीय विचारवंत न्यायमूर्ती रानडे / डॉ. आशिष मुठे | २३१ |
| ४९. | भारतीय स्त्री विचारवंत / डॉ. सुनिता राठोड | २३५ |
| ५०. | वि. वा. शिरवाडकर यांच्या नाटकातील जीवनवाद / डॉ. रविंद्रनाथ केवट | २४१ |
| ५१. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज : समाज आणि राष्ट्रउद्धारक विचारवंत / प्रा. स्वप्नील इंगोले | २४९ |
| ५२. | तत्त्वज्ञ जीवनयोगी विनोबा भावे / प्रा. रेखा आढाव | २५५ |
| ५३. | भारतीय शास्त्रीय संगीताचे शास्त्रकार - पं. विष्णु नारायण भारतखंडे / प्रा. एस. व्ही. शिंदे | २५९ |
| ५४. | महात्मा ज्योतीबा फुले आणि शिक्षण / डॉ. कविता कावरे | २६२ |
| ५५. | पंडीत जवाहरलाल नेहरुंचे भारतीय लोकशाहीतील योगदान / डॉ. बी. आर. भोसले | २६७ |
| ५६. | सरदार वल्लभभाई पटेल यांचे भारताच्या अंतर्गत सुरक्षानीति / प्रा. शेषराव तायडे | २७१ |
| ५७. | राजर्षी शाहू छत्रपती महाराजाचे शैक्षणिक विचार / प्रा. पुरूषोत्तम बांडे | २७६ |
| ५८. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील समाजजीवन / डॉ. देविदास शिंदे | २८२ |
| ५९. | पंडित विष्णू नारायण भातखंडे : संगीतातील एक थोर विचारवंत / प्रा. सुमेध सगणे | २८८ |
| ६० | फ्लाईंग शिख - मिल्खा सिंग / प्रा. आशिष बरडे | २९३ |
| ६१. | संत जनाबाईच्या अभंगांतील सामाजिक अंतरंग / डॉ. माधुरी भटकर | २९७ |


Scanned with CamScanner

# संत जनाबाईच्या अभंगांतील सामाजिक अंतरंग

प्रा. डॉ. माधुरी भटकर
मराठी विभाग,
संत गाडगे महाराज कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
वलगाव जि. अमरावती

**प्रस्तावना :**

संत नामदेव व ज्ञानदेवानी वारकरी संप्रदायाची जी बीजे पेरली होती ती खऱ्या अर्थाने या महाराष्ट्राच्या भूमीवर आता उगवायला सुरु झालेली दिसू लागली. चंद्रभागेच्या वाळवंटात खऱ्या अर्थाने भक्तीरुपी पीक वाढायला सुरुवात झाली. पंढरपूरच्या चंद्रभागेच्या वाळवंटात विठ्ठल भक्तीचा मळा फुलू लागला. या वाळवटांत सर्वच स्तरातील लोक एकमेकांच्या हातात हात घालून पुंडलिक वरदे हरी म्हणत एकमेकांच्या तोंडात कालारुपी ल्हाई घालून आपण एक आहोत. असा मानवतेचा व समतेचा संदेश ते देण्याचा प्रयत्न करु लागले.

भक्तीरुपी पावसाच्या सरी चंद्रभागेच्या वाळवंटात पडू लागल्या नि यातूनच अनेक लहान लहान रोपटी आकाराला येवू लागली. लहान वेलीच्या आधाराने अनेक फुले उमगायला सुरुवात झाली. नामदेवाच्या सहवासाने जनाबाई नावाचे फूल आता बहरायला लागले याची जाणीव आपल्याला तिच्या अंभगातून होते.

नामदेवाच्या सहवासाने जनाबाईचे अंत:करण विठ्ठल नामात दंग होवू लागले. जनाबाईच्या भक्तीपुढे नतमस्तक होवून त्यामध्ये सगुणरु साकारले जावू लागले. जनाबाइंच्या जीवनात सहभागी होऊन नामरुपी विठ्ठलाची दिनचर्येला प्रारंभ झाला. याची प्रचिती आपल्याला तिच्या अभंगातून येते. नामदेवाची दासी म्हणजेच जना व तिचा सखा म्हणजेच विठ्ठल हे समीकरण निर्माण होवू लागले. ज्याप्रमाणे मासा पाण्याशिवाय राहू शकत नाही. त्या प्रमाणेच जनाबाईला विठ्ठलाशिवाय आपले अस्तित्व आता तिला उरलेच नाही. तर विठ्ठल हा तिला आधार वाटू लागला होता.

**जनाबाईच्या अभंगाची प्रेरणा :**

जनाबाईच्या अभंगाची खरी प्रेरणा तिची अध्यात्मिक भक्ती होय. नामदेवाच्या कुटुंबामध्ये जनाबाई दासीरुपाने वावरत असताना त्या कुटुंबाचा प्रभाव तिच्या अभंगावर होवू लागला. महाराष्ट्राच्याअध्यात्माचे केंद्र असलेल्या नामदेवाच्या कुटुंबामधून जनाबाईने आपल्या अभंगरुपी भक्तीचा प्रारंभ केला. अशा या जनाबाईच्या कवितेच्या विविधांगी प्रेरणा सोदाहरण पुढील प्रमाणे सांगता येतील.

**धार्मिक ग्रंथाचा प्रभाव :**

पंढरपूर हे तीर्थक्षेत्र म्हणू भारतभर ओळखले जाते. नामदेवांच्या घरामध्ये किंबहुना पंढरपूर क्षेत्रामध्ये धार्मिक ग्रंथाचे वाचन केले जात होते. हे मध्ययुगीन मराठी जीवनाचे



Scanned with CamScanner

व्यवच्छेदक लक्षण होय. त्यामध्ये रामायण, महाराभारत, पांडवप्रताप आदि ग्रंथाचे वाचन केले जात होते. या ग्रंथाचा प्रभाव जनाबाईच्या अभंगावर पडलेला दिसून येतो. नामदेवांच्या घरी दासीरुपाने काम करत असताना जनाबाईने श्रवणरुपी या ग्रंथाचे पारायण केले. या श्रवणाने तिच्या अभंगाला वेगळी कलाटणी मिळाली. आणि या ग्रंथाचे गुणगाण ती गाऊ लागली-

हरिहर ब्रम्हादिका । नामें तरले तिन्ही लोक ।।

ऐसा कथेचा महिमा। झाली बोलयाची सीमा ।।

या पध्दतीने जनाबाईने स्पष्ट सांगितले आहे की, नाम हे ब्रम्हादिकांना तारते आणि या नामाचा जप आयुष्यभर करावा. या उद्देशाने नामरुपी कथा जनाबाईने गायलेल्या आहेत. धार्मिक कथांचे चिंतन जनाबाई आपल्या अभंगातून करताना असे म्हणते की -

मारुनियां त्या रावणा । राज्य दिधले विभीषण ।।

किंवा

अहो गोकुळींच्या देवा । आदि संत तुम्हा ठावा ।।

असे कितीतरी अभंग आपल्याला जनाबाईच्या अभंगातून दिसून येतात, की ज्यामधून रामायण, महाभारत, पांडवप्रताप आदि ग्रंथातील प्रसंगाचे चित्रण तिने आपल्या अभंगातून केलेले आहे.

नारदापासून जनाबाईने आपला गुरुमंत्र घेऊन अभंग लिहिण्यास सुरुवात केली होती. त्याचप्रमाणे नामदेवाच्या कुटुंबामध्ये जनाबाईला अध्यात्म क्षेत्राचे धडे गिरवण्यास मिळालेत्र ज्याप्रमाणे फाल्गून महिण्यात पळस बहरतो. त्याप्रमाणे जनाबाईचे अभंग चंद्रभागेच्या वाळवंटात बहरु लागले. जनाबाईच्या भक्तीरुपी वृक्षाला खज्या अर्थाने मोहर यायला सुरुवात झाला. या मोहराच्या सुगंधाने नामदेव व ज्ञानदेवालाही मोहित केले आहे.

**अभंगातील सामाजिकता**

संत हे आत्मोध्दाराबरोबरच लोकोध्दार करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे संताचे मन अहोरात्र जनकल्याणासाठी तळमळत असलेली दिसते. समाजात सर्व प्राणीमत्र समान असल्याच्या जाणिवेने भूतदयावाद मांडला आहे. यातूनच जनाबाईने अभंगांची निर्मिती केलेली आहे. त्यामुळे तिने समाजाला उपदेश करताना सामाजिकता जोपासली आहे.

बांधोनिया हात गयावळ मारिती । दंड ते करिती मोक्षासाठी ।।

गेले ते पिता मोक्षालागी तूझे । आतां देई माझे दक्षिणेसी ।।

प्रस्तुत अभंगातून जनाबाईने समाजाची मोक्षासाठी चालेली धडपड त्यांना मोक्ष हा मृत्यू पावल्याशिवाय मिळणार नाही. त्यामुळे मानवाने या मार्गात विठ्ठलाचे सख्यत्व पत्करले तर मोक्ष मिळू शकतो. असा मोलाचा उपदेश ती आपल्या कवितेतून करते.

जनाबाई आपल्या प्रत्येक उपदेशपर अभंगांतून वाळवटात येवून भक्तीचा काला करण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी समाजातील लोकांसमोर ती भक्ती मार्गाचा महत्व मांडते. यासाठी तिने समाजातील लोकांसमोर ज्ञानभंडार फोडला आहे. तो प्रत्येकाने लुटावा यासाठी ती



Scanned with CamScanner

आवाहन करते. कारण प्रपंच हा जड आहे. यातून मानवाला दुःख लाभलेले असते. कारण मानवाला तीन दुःखे भोगावी लागतात.

१. संची दुःख

२. प्रारब्ध दुःख

३. कर्म दुःख

या तीन दुःखांपासून मानव सुटका करण्याचा प्रयत्न करतो. त्यासाठी मानवाला जन्म मरणाच्या फेज्यातून वाचण्यासाठी विठ्ठलाला शरण जाण्याची विनंती जनाबाई करीत असलेली दिसून येते.

एक नाम अवघे सार । वरकड अवघे ते असार ।।
म्हणोनियां परतें करा । आधी विठ्ठल हे स्मरा ।।
जनी देवाधिदेव । एक विठ्ठल पंढरीनाथ ।।

जनाबाईने असा लोकोपदेश करुन लोकांना ती भक्तीमार्गाकडे वळवण्याचा प्रयत्न करते. असा लोककल्याणाचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून तिने लोकांना उपदेश करण्याचा प्रयत्न केला आहे.

**सामाजिक विषमता**

संत जनाबाई आपल्या अभंगातून आपण शुद्र असल्याची भावना व्यक्त करते. तिला समाजाने शुद्र म्हणून हिणवले आहे. तिला विठ्ठलाच्या मंदिरात प्रवेश नाकारल्याचे दुःख सतत जाणवत असलेले दिसते-

च्राजाई गोणाई । अखंडित तुझे पायी ।।
मज ठेवियलें द्वारी । नीच म्हणोनि बाहेरी ।।

जनाबाईला या कालखंडात विषमतेची झळ बसलेली दिसते. तिला शुद्र म्हणून बाहेर ठेवले आहे. संत नामदेवाच्या कुटुंबात १४ व्यक्तींना तुझ्याजवळ सहज जाता येते. तुझ्या या वाटेवर त्यांना थांबता येते. मला शुद्र म्हणून महाद्वाराच्या बाहेर घातले जाते. अशी ती विठ्ठलाला विनंती करते की, विठ्ठला तुझ्या भेटीसाठी दारात मी उभा आहे. केव्हा मला भेट देशील. असा प्रश्न ती विठ्ठलाला करते.

जनाबाईला तिच्या कष्टकरी जीवनात विठ्ठलाचा आधार आहे. त्यासाठी आपणाला विठ्ठलाचे दर्शन घेता यावे. अशी तिची मनोमन इच्छा आहे. त्यासाठी ती त्याच्याशी हितगुज साधण्याचा प्रयत्न करते. पण हे प्रत्यक्षात होत नसल्याने ती निराश होते. जनाबाईच्या मनात हे शल्य फार बोचत असते. आपली जागा घरात नाही तर दारात आहे. जनाबाईला दुःख सतत जाणवते की आपण अनाथ आहोत. त्यामुळे ती विठ्ठलाला विनंती करते की, विठ्ला तुझ्या भेटीसाठी दारात मी उभी आहे. केव्हा मला भेट देशील. असा प्रश्न ती विठ्ठलाला करते.

जनाबाईला तिच्या कष्टकरी जीवनात विठ्ठलाचा आधार आहे. त्यासाठी आपणाला विठ्ठलाचे दर्शन घेता यावे. अशी तिची मनोमन इच्छा आहे. त्यासाठी ती त्याच्याशी हितगुज



Scanned with CamScanner

साधण्याचा प्रयत्न करते. पण हे प्रत्यक्षात होत नसल्याने ती निराश होते. जनाबाईच्या मनात हे शल्प फार बोचत असते. आपली जागा घरात नाही तर दारात आहे. जनाबाईला दुःख सतत जाणवते की आपण अनाथ आहोत. त्यामुळे ती विठ्ठलाला सखा संबोधून आपल्या मनातील दुःखाला वाट मोकळी करुन देताना म्हणते-

काय करुं पंढरीनाथ । काळ साह्य नाही आतां ।।
मज टाकिलें परदेशी । नारा विठ्ठल तुजपाशी ।।
श्रम बहु झाला जीवा । आतां सांभाळी केशवा ।।
कोण सखा तुजविण । माझे करी समाधान ।।
हीन दीन तुझे पोटी । जनी म्हणे द्यावा भेटी ।।

जनाबाईच्या मनात तिच्या शुद्रपणाच्या भावनेचे शल्प मनात बोचत असल्याचे दिसते. त्यामुळे फक्त तिला विठ्ठलाचा आधार आहे. कारण दुःखी आयुष्याला विठ्ठलाची आनंदाने भेट व्हावी ह्यासाठी ती याचना करीत आहे.

आले व्रत एकादशी । जनी गेली राऊळासी ।।
बुक्का घेऊनिया माळा । पाणी भरोनी भोपळा ।।
येता दुरोनी देखिली । अवघी घामाघूम झाली ।।
होईल देवासी विटाळ । जाली फराळाची वेळ ।।
फुले-माळा विखुरली । तुंब्याची ते गत झाली ।।

तिला आपल्या जीवनात पदोपदी शुद्र म्हणून अपमान सहन करावा लागला. ती विठ्ठलावरील प्रेमापोटी हा अपमान सहन करीत होती. हा समाजाचा अपमान सहन करण्याची तिची शोषिक वृत्ती दिसून येते. याची प्रेरणा तिने चोखोबांकडून घेतल्यामुळे तिला चोखोबांचा आदर वाटतो.

१. यातिहीन चोखामेळा । त्यासी भक्तांचाकळवळा ।।
त्याचा झाला म्हणीयारा । राहे घरी धरी थारा ।।
२. चोखामेळा संत भला । तेणे देव भुलविला ।।

असा जनाबाईने चोखोबांविषयी आपल्या अभंगातून आदर व्यक्त केलेला दिसतो. आपल्या उपेक्षित जीवनात ती चोखोबांच्या भक्ती मार्गावर जाण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे जनाबाईला चोखोबा जवळचे वाटू लागले. चोखोबाने देव बाटवला असे म्हटल्यावर तिला हसू येते. या पाठीमागे तिचे वेगळे शहाणपण आहे. म्हणूनच जनाबाईने परखडपणे विषमता मांडली नसती तरी विषमतेचे विचार सौम्य पध्दतीने मांडण्यात ती यशस्वी झाली आहे. आपल्या शुद्र जाणिवेमुळे तिच्या मनाची होणारी घुसमट अभिव्यक्त केली आहे.

जनाबाईला आपल्या दासीपणाचे दुःख होते. तिची विठ्ठलाच्या चरणापाशी सुद्धा भक्त मंडळीनी सुध्दा अवहेलना केलेली आहे. हे सर्व जनी ही आहे म्हणून होते का? असा प्रश्न ती विठ्ठलाला विचारते



Scanned with CamScanner

हीन दीन तुझे पोटी । जनी म्हणे द्यावी भेटी ।।

तिने अनुभवलेले सामाजिक विषमतेचे चटके हळुवारपणे ती आपल्या अभंगातून मांडते. हे तिच्या अभंगाचे वेगळेपण असून ती ही विषमता मांडताना एखाद्या शब्दातून आपल्या मनातील वेदना भावरुपाने मुखर करताना दिसते. जनाबाईचा जन्म हा नामदेवाच्या सेवेसाठी झाला आहे. त्यामुळे त्यांचा युगांयुगांचा संबंध जनाबाईने सांगितला आहे. त्यामुळे तिच्या पदरी मात्र हीनत्व, दास्यत्व पडलेले आहे. ती हीन जातीत जन्मल्यामुळे तिला आणि चोखोबाला विठ्ठल मंदिराच्या बाहेर स्थान मिळाले होते. एवढे दुःख जनाबाईच्या वाट्याला येण्याचे कारण म्हणजे या वाटेवर समाजाने विषमतामूलक खिळे रोवले असल्यामुळे आपल्या अभंगातून ती या विषमतेविरुध्द राग व्यक्त करते. त्यामुळे तिच्या कवितेला वास्तवाचे परिणाम लाभले आहे.

**संदर्भ :-**

१. जनाबाई - श्री. नामदेवाची गाथा - अभंग क्र. २७२, गीता प्रेस, गोरखपूर.
२. डॉ. सुहासिनी इर्लेकर - संत कवी आणि कवयित्री एक अनुबंध, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, २००६.
३. जनाबाई - श्री नामदेवाची गाथा - अभंग क्र. २८१, गीता प्रेस, गोरखपूर.
४. डॉ. द. बा. भिंगारकर - संत जनाबाई चरित्र, काव्य आणि कामगिरी, मॅजेस्टिक प्रकाशन मुंबई, १९८९.
५. डॉ. सुहासिनी इर्लेकर - संत जनाबाई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सास्कृतिक मंडळ, मुंबई २००२.



Scanned with CamScanner